**सुभाषित :**

बृहत्सहाय: कार्यान्तं क्षोदीयानपि गच्छति |
संभूयाम्भोधिमभ्येति महानद्या नगापगा ||

**अर्थ :**

अगदी लहान (क्षुद्र) जरी असला, तरी थोरामोठ्यांच्या मदतीने त्याचं काम पूर्ण होतं. जसं पर्वतातून निघालेले ओढे मोठ्या नदीला मिळाल्यावर समुद्राला जाऊन मिळतातच.